दाखव. मला एकदम तालीम मास्तरांची दोन वाक्य आठवली जी वाक्य ऐकली की काम करणारी मुलं एकदम चमकत व व्यवस्थित काम करु लागत. मी आजीला म्हटलं आजी मला आणखी येतंय! म्हणून दाखवू? ती हसली तिची संम्मती समजून मी तालीम मास्तर म्हणत असत ती वाक्यं म्हणावयास सुरुवात केली. आजोबा समोर बसले होते. जरा वाकून बसले होते. त्यांच्याकडे हात करुन म्हणालो. "अरे रांड लेका वाकून काय बसलास सरळ बैस". आजोबा एकदम चमकले, सरळ झाले, मला आनंद झाला. माझ्या वाक्याचा परिणाम झाला असं वाटल. आता मला नक्की आजोबांकडून चांगले बक्षीस मिळणार याची खात्री झाली. "काय म्हणालास तू?" इति आजोबा. मला जास्त हुरुप आला होता. आता जास्तच जोरात म्हणालो. "अरे रांड लेका वाकून बसला होतास ते सरळ बसलास शिंचीच्या, असाच बस". बक्षीसाच्या आशेने आजोबांच्या जवळ गेलो. जबरदस्त थोबाडीत बसली. मी भिंतीवर आदळलो. मी ओरडत होतो. आजोबा मला मारत होते. आजी व आई मला वाचविण्याचा प्रयत्न करत होत्या. आजी आजोबांवर ओरडत होती. आता का पोराला मारताय. त्याला मेळ्यात घालू नका म्हणून सांगितलं होत. ऐकल नाही. पोराला आणखी माराल तर माहेरी जाईन नातवाला घेऊन. नोकरांनी आजोबांना धरून ठेवलं. आईला संधी मिळाली व ती मला घेऊन वरच्या खोलीत गेली. "अस बोलायच नाही, पुन्हा कधी अस म्हणू नकोस," आई मला बजावत होती व मी तिला आजोबांनी मला का मारल अस रडत रडत विचारत होतो. काय बोलू नको.... सांग मला.... आई सांगावयास जायची व थांबायची फक्त म्हणायची नाही.... अस नाही बोलायच. अस म्हणजे कस हे मला कळत नव्हत. आजोबांनी इतक का मारल हे मला कळत नव्हत. जरा मोठा झाल्यावर कळल की, मी केवढा गाढवपणा केला होता. रांड...लेका...कोंबडीच्या... हाल्या....ह्या शब्दांचा अर्थ मला माहित नव्हता. कारण हे शब्द आमच्या घरी मी कधीच ऐकले नव्हते. ही शिवी आहे हे देखील मला माहित नव्हत.... अर्थात त्यानंतर माझा मेळा थांबला.

मी मात्र ठरवलं होत ज्यांच्याकडून मी मार खाल्ला त्याच आजोबांकडून मी शाबासकी मिळवीन. ही संधी मला लवकरच मिळाली. माझ्या टोकदार नाकाने मिळवून दिली. आमच्या शाळेत 'गड आला पण सिंह गेला' हे नाटक बसवण्यास घेतले. माझ्या टोकदार नाकामुळे मला शिवाजीचे काम मिळाले. नाटकाच्या तालमी शाळेच्या वेळातच